# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

**तक्रार क्र. ४९३ते ५२०, ५९२ ते ६२६, ९७९ ते ९९०/२०२२छ.संभाजीनगर (एकूण ७१ प्रकरणे)**

श्री.महेश शंकरलाल शंकरपेल्ली, : तक्रारदार
रा.माँ दुर्गा निवास शास्त्री कॉलनी,सिल्लोड,
जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद,
कार्यालय सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय सिल्लोड,
छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ छत्रपती संभाजीनगर ★ सत्यमेव जयते

**निर्णय**

**(सुनावणी दि. २५.०४.२०२४)**

तक्रारदार यांनी दि.२९.०४.२०२२, दि.२४.०५.२०२२ व दि.१२.१२.२०२२ रोजी राज्य माहिती आयोगाकडे कलम १८ नुसार एकूण ७१ तक्रारी दाखल केलेल्या आहेत. त्यामध्ये तक्रारदार यांनी, व्दितीय अपील सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. तसेच आदेशाची अंमलबजावणी केली नाही, असे नमूद करुन संबंधितावर नियमानुसार कार्यवाही करावी, अशी विनंती केलेली आहे.

आयोगाने तक्रारदार यांच्या द्वितीय अपील प्रकरणामध्ये :- "वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी विवेचनामध्ये नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहितीचे अवलोकन द्यावे व अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेल्या ५० पृष्ठांच्या माहितीच्या छायाप्रती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य द्याव्यात व अपीलार्थी यांना उर्वरित माहिती आवश्यक असल्यास ती सशुल्क द्यावी." असे आदेश पारित केलेले आहेत.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या सर्व तक्रार प्रकरणामध्ये एकाच दिवशी सुनावणी घेण्याविषयी विनंती केलेली आहे. त्यानुसार तक्रारदार यांच्या एकूण ७१ तक्रार प्रकरणामध्ये दि.१३.०६.२०२३ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. मात्र प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांची बाजू ऐकुन घेणे आयोगास आवश्यक वाटल्यामुळे विचाराधिन प्रकरणामध्ये दि.११.१०.२०२३ व दि.१२.१०.२०२३ रोजी सुनावणी प्रस्तावित करण्यात आलेली होती.

त्यानुसार दि.११.१०.२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली आहे.सुनावणीच्या वेळी तक्रारदार, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

या सुनावणीच्या वेळी श्री.एस.आर गोराडे, वर्तमान जन माहिती अधिकारी यांना व्दितीय अपिलाच्या आयोगाकडील आदेशाच्या अनुपालनाविषयी काय कार्यवाही केली, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत निर्देशित करण्यात आलेले होते. त्यानुसार या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, विचाराधिन प्रकरणातील तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री.पी.पी.बनसोडे हे नियत वयोमानानुसार माहे जुलै २०२१ मध्ये सेवानिवृत्त झाले असुन त्यांच्यानंतर कार्यरत असलेले तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री.अझरखान बी.पठाण हे नियत वयोमानानुसार माहे मे २०२२ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. श्री.गोरोडे यांनी पुढे असे अवगत केले की, तत्कालीन दोन जन माहिती अधिकारी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडील निर्णयांचे पालन केले किंवा कसे याविषयी भाष्य करता येत नाही. मात्र दि.०३.०८.२०२३ रोजींच्या आयोगाकडील कारणे दाखवा नोटीशीच्या अनुषंगाने संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री.पी.पी.बनसोडे व श्री.ए.बी.पठाण आणि कार्यालयातील सहायक जन माहिती अधिकारी यांचा समन्वय करुन आयोगाने व्दितीय अपिलाच्या निर्णयामध्ये निर्देशित केलेल्या माहितीचा कार्यालयाच्या अभिलेखामध्ये कसोशीने शोध घेण्यात आला व या कार्यवाहीदरम्यान अभिलेखात उपलब्ध झालेली माहिती नोंदणीकृत टपालद्वारे माहे ऑगस्ट २०२३ व सप्टेंबर २०२३ या कालावधीमध्ये तक्रारदार यांना ७१ व्दितीय अपील संदर्भातील तक्रारीमध्ये (एकूण २,०८६पृष्ठे) इतकी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

दिनांक ११.१०.२०२३ रोजीच्या सुनावणीमध्ये श्री.एस.आर.गोराडे, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे केलेल्या युक्तिवादाच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी आयोगास असे अवगत केले की, संबंधित जन माहिती अधिकारी, नगर परिषद, सिल्लोड यांनी सर्व प्रकरणामध्ये जी माहिती दिलेली आहे, ती माहिती चुकीची / अस्पष्ट, अवाचनीय तसेच छायांकित प्रती साक्षांकित न करता दिलेली आहे.

तक्रारदार यांनी केलेल्या युक्तिवादाच्या अनुषंगाने तत्कालीन राज्य माहिती आयोगाने, विचाराधिन प्रकरणातील वस्तुस्थितीची शहानिशा करणेबाबत श्रीमती रा.नि.मोरे, कक्ष अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. मात्र दरम्यानच्या कालावधीमध्ये श्रीमती मोरे यांची प्रशासकीय कारणास्तव बदली झाल्यामुळे अशी कार्यवाही पूर्ण होऊ शकलेली नाही.

या दरम्यानच्या कालावधीमध्ये दि.१९.१२.२०२३ रोजी श्री.पी.पी.बनसोडे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे आपला लेखी युक्तीवाद सादर केला त्यामध्ये नमूद केले की, माहिती अधिकारातील प्रकरणे ही सन २०१९-२०२० या दरम्यानच्या कालावधीत त्यावेळी कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे माझ्याकडून माहिती दिली गेली नाही. सदर कालावधीमध्ये सिल्लोड शहरामध्ये कोविड-१९ निर्मुलन तसेच उपाययोजनांच्या कामात सर्व कर्मचारी/अधिकारी व्यग्र असल्यामुळे कार्यालयीन कामकाजामध्ये दिरंगाई झालेली आहे. तसेच सन २०१९मध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे मी पाणी पुरवठा अभियंता असल्या कारणाने शहरास अत्यावश्यक सेवा देणे हे देखील माझे आद्यकर्तव्य होते. तत्कालीन विभागीय आयुक्त यांचे आदेशाने जाफ्राबाद, भोकरदन, व सिल्लोड या शहरांना खडकपुर्णा प्रकल्पातुन टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे आदेश होते. मला सततच्या पाणी टंचाईच्या उपाय योजनेच्या कामामध्ये व्यस्त असल्या कारणामुळे प्रत्यक्षात कार्यालयामध्ये उपस्थित राहता आले नाही. माहे जुलै २०२१ मध्ये मी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झालो. संबधित प्रकरणामध्ये माहिती न दिल्यामुळे मला रक्कम १,२८,०००/- इतकी शास्ती झाली होती, ती रक्कम मी शासन खाती जमा केली आहे. त्यामुळे माझ्याविरुध्द कोणतेही कार्यवाही करण्यात येऊ नये.

तसेच श्री.ए.बी.पठाण,तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा दि.१९.१२.२०२३ रोजी आपला लेखी युक्तीवाद सादर केला त्यामध्ये त्यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी म्हणून दि.०७.०२०२० ते दि.०८.०९.२०२१ या कालावधीमध्ये कार्यरत होतो. सन २०२०-२०२१ या कालावधीमध्ये कोरोना सारखी महामारी आली असल्यामुळे त्याविरुध्द लढण्यासाठी नगर परिषद सिल्लोड यांच्याकडे उपलब्ध असल्या अत्यल्प कर्मचारी वर्ग तैनात करण्यात आला होता. मी सुध्दा कोरोनाने बाधित झालो होतो. या कालावधीमध्ये नगर परिषदेच्या वतीने शहर सॅनीटायझ (sanitation) करणे, शहर स्वच्छता करणे व कोरोना लसीकरण यासाठी सर्व कर्मचारी वर्ग तैनात करण्यात आला होता त्यामुळे एकही कर्मचारी कार्यालयामध्ये उपलब्ध नव्हता. अशा परिस्थितीमुळे सदरील माहिती पुरविता आलेली नाही. मी नियत वयोमानानुसार दि.३१.०५.२०२२ रोजी सेवानिवृत्त झालो आहे. त्यामुळे माझ्याविरुध्द कोणतेही कार्यवाही करण्यात येऊ नये.

दिनांक १९.१२.२०२३ रोजी श्री. मो.जुबेर सिध्दिकी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा आपला लेखी युक्तीवाद सादर केला त्यामध्ये त्यांनी नमूद केले की, दि.१६.१०.२०२३ रोजी पदोन्नतीने नगर परिषद सिल्लोड येथे रुजु झालो असुन माझे दि.१७.१०.२०२३रोजी जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार देण्यात आला आहे. उपरोक्त सर्व तक्रार प्रकरणेही रुजु होण्यापूर्वीची आहेत. तसेच श्री. एस.आर. गोराडे, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वीच माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे दिली आहे. तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी या नात्याने अस्पष्ट, अवाचनीय, अपूर्ण असलेली माहिती नगर परिषद सिल्लोड यांच्या अभिलेखातून पुन्हा देण्याच प्रयत्न करेन किंवा अवलोकनासाठी उपलब्ध करुन देईन.सदर प्रकरणामध्ये माझ्या विरुध्द कोणतेही कार्यवाही करण्यात येऊ नये.

या नंतर तक्रारदार यांनी दि.२०.०३.२०२४ रोजी आयोगास निवेदन सादर करुन, त्यांच्या ७१ तक्रार प्रकरणामध्ये लवकरात लवकर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्याची विनंती केलेली आहे. त्यानुसार विचाराधिन प्रकरणामध्ये दि.२४.०४.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. तथापि प्रकरणातील तक्रारदार यांना नेमकी कोणती माहिती मिळाली अथवा मिळाली नाही याबाबत त्यांचे म्हणणे सविस्तररित्या ऐकुन घेण्याकरिता विचाराधिन प्रकरणात सुनावणीची पुढील तारीख दि.२५.०४.२०२४ अशी निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज दि.२५.०४.२०२४ रोजी या प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली आहे. सुनावणीच्या वेळी तक्रारदार ,तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

राज्य माहिती आयोग सत्यमेव जयते खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोरील युक्तीवाद, उपलब्ध अभिलेख व अधिनियमातील तरतुदीनुसार, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (७) नुसार आयोगाकडील निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक असुन अशा निर्णयाचे अनुपालन करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार तक्रारदार यांच्या ७१ व्दितीय अपील प्रकरणात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे तक्रारदार यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडुन माहितीचे प्रदान झालेले आहे. मात्र मिळालेली माहिती चुकीची /अस्पष्ट, अवाचनीय तसेच अपूर्ण छायांकित प्रती साक्षांकित न करता दिलेली आहे, असे तक्रारदार यांनी आयोगास अवगत केलेले आहे. सबब, तक्रारदार यांनी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांचेकडुन प्राप्त झालेल्या माहितीसह नगर परिषद, सिल्लोड येथे व्यक्तिश: उपस्थित राहावे. आयोगाने सुचित केल्याप्रमाणे तक्रारदार कार्यालयात उपस्थित राहिल्यानंतर मुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी संबंधित

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली संपूर्ण माहिती साक्षांकित करुन द्यावी. तसेच ७१ व्दितीय अपील प्रकरणातील आयोगाकडील निर्णय विचारात घेऊन, जी माहिती उपलब्ध करुन देता येत नाही किंवा जी माहिती कार्यालयात उपलब्ध नाही, याबाबतची स्पष्ट वस्तुस्थितीदर्शक कारणमिमांसा मुख्याधिकारी,नगर परिषद, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदारास लेखी अवगत करावी, या निष्कर्षाप्रत येऊन वर नमूद सर्व ७१ तक्रारी निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, आयोग असे निर्देश मुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर यांना देत आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ ची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता प्रभावी उपाययोजना त्वरीत अंमलात आणाव्यात.

अत:आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त विवेचनानुसार ७१ तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

तक्रार क्र. ४९३ते ५२०, ५९२ ते ६२६, ९७९ ते ९९०/२०२२छ.संभाजीनगर जावक क्र. 9854/२०२४ दिनांक : 12.6.2024